बचावपक्षाचा पुरावा

दि.११/१०/२०२२. प्रकरण क्रं. :— १८८/पीडब्ल्यू/२०१८

निशाणी क्रं. :— २५

साक्षीदार क्रं. :— ३
माझे नाव :— उषा शालीक केदारे.
वय :— ४५ वर्षे. कामधंदा :— शेती.
सध्या राहणारा :— शहापुर, जि. ठाणे.

सरतपास बचाव पक्षातर्फे विधिज्ञ श्री हसमुख व्होरा यांच्या मार्फत

साक्षीदाराने आता त्यांचे आधारकार्ड दाखविले. सदर आधारकार्डवरून सदरहू साक्षीदार ह्या त्याच असल्याचे खात्री झाली. माझ्या मुलाचे नाव तेजस शालीक केदारे असे आहे. मी आरोपीला ओळखते. आरोपी आमच्या शेजारीच राहतो. आरोपी हा शेतीचे काम करतो. दि.०३/०३/२०१८ रोजी, मी माझ्या मुलाला आरोपीसोबत फिरण्याकामी मुंबईला पाठविले होते. शेती व्यतिरिक्त आरोपीचा इतर कोणताही कामधंदा नाही. सदर केसच्या संदर्भात पोलीस माझ्याकडे कधीहि आले नव्हते व मी देखील कधीहि पोलीस स्टेशनला गेले नव्हते. पोलीस स्टेशनमधून मला फोन देखील आला नव्हता. आरोपी सोबत माझा मुलगा व त्याचा एक मित्र मुंबईला फिरण्यासाठी आले होते. जयपुर या ठिकाणी आरोपीचा कोणताहि व्यवसाय नाही. आरोपी माझ्या मुलाला जयपुर या ठिकाणी घेवून जात नव्हता.

सरतपास संपला.

उलटतपास विशेष सरकारी अभियोक्ता
श्रीमती शेख नाजिया नुरूल अमीन यांच्यामार्फत

विशेष सरकारी अभियोक्ता यांनी बचावपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या साक्षीदारांचे आधारकार्ड पडताळणीकामीचा अर्ज

(नि. क्र.२७) दाखल केला. त्यावर बचावपक्षाच्या विधिज्ञांचे म्हणने मागविण्यात आले. दोन्ही उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकूण प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात आला. करिता उलटतपास पुढिल तारखेपावेतो तहकूब करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)
दि.११/१०/२०२२. महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
सराद. मुंबई सेंट्रल, मुंबई.